## जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कोल्हापूर

## रमाई आवास घरकुल योजना

**१) योजनेची प्रस्तावना:-**

अनुसुचित जाती व नवबौध्द घटकासाठी रमाई आवास घरकुल योजना ही यापूर्वी सामाजिक न्याय विभागाच्या संचालक, समाजकल्याण यांचेमार्फत राबविणेत येत होती. ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील २१ ऑक्टोंबर २०१० च्या शासन परिपत्रका नुसार सदर योजना हि जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणे कडे हस्तांतरीत करणेत आली. सदर योजनेची अमंल बजावणी इंदिरा आवास योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार करणेत येते.

**<u>२) योजनेचे निकष</u> :-**

१) लाभार्थी दारिद्रय रेषेखालील यादीतील असावा.
२) लाभार्थीची निवड ग्रामसभेने करणेची असून ग्रामसभेने तयार केलेल्या कायम बेघर प्रतिक्षा यादीतील दा.रे.गुणानुक्रमे निवड करणेची आहे.
३) घरकुलासाठीची जागा लाभार्थीची स्वमालकीची /शासनाने उपलब्ध करुन दिलेली असावी.
४) घरकुलाचे बांधकाम २६९ चौ.फुटाचे असावे.
५) घरकुलास जोडून शौचालय बांधणेचे आहे.
८) रमाई आवास योजने अंतर्गत रु.७०,०००/- इतके अनुदान दिले जाते.
९) घरकुलाचे बांधकामासाठी कंत्राटदार किंवा खात्याअंतर्गत एजन्सी यांचा सहभाग असणार नाही तर लाभार्थीला घर बांधकामाचे स्वातंत्र्यअसणार आहे.

**<u>३) योजनेचा उद्देश</u> :-**

अनु.जाती व नवबौध्द परंतु दारीद्रय रेषेखाली असणा-या कुटुंबाना घरे बांधुन देणे.

**४) अंमलबजावणी :-**

या योजने अंतर्गत सन २००२ च्या दारिद्रय रेषेखालील परंतु निवारा नसलेल्या कुटुंबाची ग्रामपंचायत निहाय अनु.जाती/जमाती व बिगर अनुसुचित जाती/जमाती यांकरिता स्वतंत्र कायम प्रतिक्षा यादी बनविण्यात आलेली आहे. ही कायम प्रतिक्षा यादी तील कुटुंबाना मिळालेल्या गुणांकाप्रमाणे चढत्या क्रमोन बनविणेत आली आहे. या यादी नुसार पात्र लाभार्थ्यास गुणानुक्रमे घरकुल मंजूर करणेत येत होते. आता सन २०१०-११ पासून ग्राम विकास वक जलसंधारण विभागाकडील दि.९-४-१० च्या शासन निर्णयान्वये या पध्दतीमध्ये सुधारणा करणेत आली आहे. त्याप्रमाणे जिल्हयातील शिल्लक लाभार्थ्यांच्या चढत्या क्रमांकानुसार ग्रामपंचायत निहाय यादी करावयाची असून यादीतील लाभार्थ्यासमोर अ.जा व नवबौध्द अशी नोंद घ्यावयाची आहे. त्यानुसार पहिल्या गावापासून सुरुवात करुन त्यातील प्रत्येक गावातील एकूण उद्दिष्टा प्रमाणे लाभार्थ्यांना घरकुले मंजूर करावयाची आहेत. सदरचे प्रस्ताव ग्रामपंचायती मार्फत पंचायत समिती कडे मंजुरी साठी सादर केले जाते तेथे छानणी होऊन प्रशासकिय मान्यतेसाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणे कडे पाठविली जातात.